
फुले-शाहू आंबेडकर
विचारांची प्रासंगिकता
संपादक -
• डॉ. मनिष सोनवणे
उपसंपादक -
• डॉ. सी.डी. राजपूत
• प्रा. उद्धव कुडासे
• प्रा. अजय अहिर
• प्रा. अशोक वाघचौरे

अथर्व पब्लिकेशन्स

फुले-शाहू-आंबेडकर विचारांची प्रासंगिकता

© सुरक्षित

ISBN : 978-93-91712-88-4
पुस्तक प्रकाशन क्र. ९१९

**प्रकाशक व मुद्रक**
युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स**
**धुळे :** १७, देविदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे- ४२४ ००१.
**संपर्क :** ९४०५२०६२३०
**जळगाव :** शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी,
तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव- ४२५ ००१.
**संपर्क :** ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
**ई-मेल :** atharvapublications@gmail.com
**वेबसाइट :** www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती :** १९ फेब्रुवारी २०२२
**अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स
**मूल्य :** ७००

**E-Book *available on***
**amazon.in ▪ GooglePlayBooks ▪ atharvapublications.com**

**ऑनलाइन पुस्तक खरेदीसाठी www.atharvapublications.com**

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

२१ डॉ. बाबासाहेब आंबेडकर : शेतीविषयक
विचार व कार्य ........................................ १४४
- प्रा. राहुल ज्ञानदेव देसले

२२ महात्मा फुले यांचे लोकशाहीविषयक विचार ........................ १४८
- प्रा. रत्नाकर सुभाष वाघ

२३ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाहीविषयक विचार ........... १५२
- प्रा. एन. ए. पाटील

२४ महात्मा जोतिराव फुले : भारतीय शिक्षणक्रांतीचे जनक ........... १५७
- डॉ. हनुमंत कुरकुटे

२५ राजर्षी शाहू महाराज के विचारों की प्रासंगिकता .................. १६४
(उद्योग, व्यापार और सहकार के विशेष संदर्भमें)
- डॉ. राजाराम गमन शेवाले

२६ फुले-शाहू-आंबेडकर या महापुरुषांच्या
विचारांची प्रासंगिकता ........................................ १७१
- डॉ. अजय प्रभाकर कुंटे

२७ फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांची प्रासंगिकता.............. १७५
- डॉ. सुनीता लिंबराज गुजर

२८ ज्योतिबा फुले जी की समाजसुधारक की प्रासंगिकता ............. १७९
- डॉ. व्ही. डी. सूर्यवंशी

२९ कामगार दिन आणि कामगारांचे आधारस्तंभ :
डॉ. बी. आर. आंबेडकर........................................ १८५
- डॉ. आर. के. बिन्नीवाले

३० महात्मा जोतीराव फुले आणि महाराष्ट्रातील
शैक्षणिक क्रांती ........................................ १९०
- डॉ. कैलास कारभारी खैरनार

३१ 'मूकनायक' वृत्तपत्रातील डॉ. बाबासाहेब
आंबेडकरांचे विचार ........................................ १९४
- डॉ. यशवंत सोनुने, बाबासाहेब भा. खंडाळे

३२ छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे विचार........................ १९८
- डॉ. छाया भास्कर भोज

– सहा. प्रा. राहुल ज्ञानदेव देसले
म. स. गा. कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, मालेगाव

**प्रस्तावना –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अनेक क्षेत्रांमध्ये नेतृत्व करताना आपण अभ्यासले आहे. डॉ. बाबासाहेबांच्या जीवनाचे अनेक पैलू आपणास दिसून येतात. घटनाकार, समाजसुधारक, कायदेतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, इतिहासकार, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील खंबीर नेतृत्व, कामगार नेता, शेतकरी नेता, पत्रकार, उत्तम वकील असे अनेक पैलू दिसतात. दलित समाजाच्या उद्धारासाठी केलेले काम याची तर जागतिक पातळीवर नोंद घेतली गेली आहे. स्वतंत्र भारताच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेबांचे अमूल्य असे योगदान आपणांस दिसून येते. स्वतंत्र भारताच्या पायाभरणीत पंडित नेहरूंनी संस्थात्मक पायाभरणीत जी अग्रणी भूमिका घेतली, त्या उभारणीत डॉ. बाबासाहेबांचे योगदान नजरेआड करता येणार नाही. स्वतंत्र भारताच्या समस्यांची इतकी वास्तववादी मांडणी करणारा नेता आपणास त्या कालखंडात दिसून येत नाही.

संविधान निर्मितीचे अशक्यप्राय अवघड काम अतिशय कौशल्याने हाताळणारे डॉ. बाबासाहेब भारताच्या समोर असणाऱ्या प्रत्येक समस्येचे उत्तर शोधताना सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक प्रश्नांची उकल अतिशय निर्भिडपणे करताना दिसतात आणि यामुळेच त्यांच्या बुद्धिवादी, तर्कसंगत मांडणीचे कौतुक राजकीय विरोधकदेखील करता. यातच बाबासाहेबांचे मोठेपण सामावले आहे.

**उद्दिष्टे –**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शेतीविषयक विचारांचा अभ्यास करणे.
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शेतीविषयक कार्याचा मागोवा घेणे.
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शेतीविषयक विचारांची वर्तमान काळातील उपयुक्तता तपासणे.

**शेती समस्यांची मांडणी** – डॉ. बाबासाहेबांनी अगदी विद्यार्थिदशेपासूनच शेती समस्यांविषयी चिंतन केलेले दिसून येते. 'स्मॉल होल्डिंग इन इंडिया' या १९१७ मध्ये लिहिलेल्या शोधनिबंधात भारतीय शेतीविषयक समस्यांची मांडणी केली आहे. या निबंधात ते उद्योगांची विभागणी करताना प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन प्रकारात करतात. मानवाच्या सर्व गरजा या शेतीतून पूर्ण होतात म्हणून शेती हा प्राथमिक आणि सर्वात प्राचीन उद्योग आहे, असे त्यांचे प्रतिपादन आहे. भारतातील शेती किफायतशीर नसल्याची अनेक कारणे आहेत. कोणते उत्पादन करावे ? त्यासाठी आवश्यक असणारी शेती (जमीन), तिचा आकार, तिची प्रतवारी (कस), उत्पादन निर्मितीसाठी लागणारी साधने, बैल, नांगर, पाणी, मजूर इत्यादी अशा अनेक समस्या दिसून येतात. त्यातील महत्त्वाची समस्या म्हणजे शेतकरी आत्महत्या, म्हणून लोकशाही व्यवस्थेने याची जबाबदारी शासनव्यवस्थेवर टाकली आहे. यामुळेच सरकार शेती व शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी वेगवेगळ्या योजनांपुढे आणत असते. आजही शेतकऱ्यावरील कर्ज ही मोठी समस्या आहे. यासाठी कर्जमाफी हा एक उपाय पुढे येऊ लागला आहे. मात्र हा तात्पुरता उपाय आहे आणि दुर्दैवाने सद्यःस्थितीतदेखील या लोकप्रिय, पण निरुपयोगी उपायाचा स्वीकार केला जातो. डॉ. बाबासाहेबांच्या मते शेती किफायती करण्यासाठी कर्जमाफी हा एकमेव उपाय नसून जोवर शेतीकडे 'उद्योग' म्हणून बघत नाही तोवर शेतीतील प्रश्न सुटणार नाही. शेती हा उद्योग म्हणून परवडणार नाही. कारण मानवासाठी आवश्यक असणारा अन्न पुरवठा, अन्ननिर्मिती करणाऱ्या ह्या उद्योगाच्या समस्यांकडे आद्य प्रश्न म्हणून पाहिले पाहिजे, असे डॉ. बाबासाहेब आग्रही मत मांडतात. भारतातील शेतीवरील लोकसंख्येचा बोझा कमी करण्याकरिता भारताचे औद्योगिकीकरण होणे गरजेचे आहे. घरतील सर्वच मुलांनी शेतीवर अवलंबून न राहता उत्पादनाचे नवीन पर्याय स्वीकारणे गरजेचे आहे.

शेतकऱ्यांच्या समस्या निराकरणासाठी त्यांच्या समस्यांची शास्त्रशुद्ध मांडणी केली. अगदी त्याच आधारावर त्यांच्यासाठी आंदोलनाचीदेखील आखणी केलेली दिसून येते. आपल्या सार्वजनिक राजकीय जीवनाच्या सुरुवातीला कामगार, शेतकरी, मजूर यांच्या अनेक प्रश्नांना त्यांनी हात घातला. त्यासाठी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली होती. त्याचा एक भाग म्हणून कोकण विभागात 'खोत पद्धत' अस्तित्वात होती. खोत पद्धतीची तुलना आपण ब्रिटिशांनी भारतात लागू केलेल्या 'कायमधारा पद्धत' हिच्याशी करू शकतो. खोताकडून कुळाचे मोठ्या प्रमाणात शोषण केले जात होते. या पद्धतीला १९०५ ते १९३१ दरम्यान बऱ्याच मोठ्या प्रमाणत विरोध झाला. १३ एप्रिल १९२९ रोजी चिपळूण येथे शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी एल्गार पुकारण्यात आला. डॉ. आंबेडकर यांनी

कुळाचे स्थलांतर आणि संप अशा मार्गांचा उपाय सुचवला. डॉ. बाबासाहेबांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत १९३३ ते १९३९ अशी सात वर्षे भारतात शेतकऱ्यांचा पहिला संप घडवून आणला. याच दरम्यानच्या काळात १९३७ मध्ये मुंबई कायदेमंडळात खोत पद्धत रद्द करण्याचा प्रस्ताव मांडला होता. या सर्व लढ्याला १९४९ मध्ये यश मिळाले आणि खोत पद्धत रद्द झाली. तसेच 'महार वतन' संदर्भातदेखील डॉ. बाबासाहेबांची भूमिका अगदी स्पष्ट होती. महार वतनपद्धतीमुळे महारांच्या स्वाभिमानी जीवन जगण्यात अडथळा येतो, छोट्याशा जमिनीच्या तुकड्यासाठी अनेक अमानवी कामे त्यांना करावी लागत होती. त्यातून मुक्तता मिळावी यासाठी १९३७ मध्ये मुंबई कायदेमंडळात महार वतन रद्द करण्याचा प्रस्ताव सादर केला.

डॉ. आंबेडकरांनी शेती समस्या सोडविण्यासाठी सहकारी शेती हा उपाय सुचविला होता. लहान धारण क्षेत्रावर अँडरसन याने मुंबई कायदे मंडळात १९३७ 'अल्पभूधारक मदत विधेयक' मांडले. यात एका विशिष्ट मर्यादे पलीकडे जमिनीचे विखंडन होणार नाही, अशी तरतूद करण्यात आली होती. यास डॉ. आंबेडकरांनी विरोध केला, कारण अशापद्धतीने विभाजन थांबविल्यास असंख्य लोक भूमिहीन होतील. त्यामुळे भारतीयांच्या दारिद्र्यात भर पडेल, तसेच वडिलोपार्जित जमिनीत सर्वांना हिस्सा हवा असतो. सातबारा नावावर असणे ही भावनिक गरज आहे, ही खरी अडचण आहे. यामुळे आपल्या राज्य समाजवाद या विचारधारेत ते सहकारी शेतीवर भर देतात. 'स्टेट अँड मायनॉरिटीज' या मसुद्यात शेती हा सरकारी उद्योग असावा असे मांडतात. गायरान, देवस्थानच्या, पडीक जमिनी सरकारने आपल्या ताब्यात घेऊन त्यांचे भूमिहीनांमध्ये वाटप करावे, अशीही सूचना डॉ. बाबासाहेब आंबेडकर करत. अशा पद्धतीने शेती केल्यास शेतीवरचा भार कमी होण्यास मदत होईल तसेच शेतीचे यांत्रिकीकरणदेखील करणे सुलभ होईल.

भारतातील शेती समस्या सोडवणुकीसाठी स्वातंत्र्यानंतर 'गोरवाल समिती' गठित करण्यात आली. या समितीने शेतकऱ्यांचे वर्णन करताना म्हटले, भारतीय शेतकरी हा कर्जातच जन्मतो, कर्जातच वाढतो व कर्जातच मरतो. अशा विपन्न अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी त्रिसूत्री सुचवली होती.

१) शेती ही आधुनिक तंत्र व यंत्र यांच्या साहाय्याने झाली पाहिजे. पारंपरिक शेती कधीही समृद्धी आणू शकत नाही.
२) शेतीच्या आधुनिकीकरणासाठी जमिनीच्या लहान-लहान तुकड्यांचे एकीकरण झाले पाहिजे.
३) शेतीला सुधारित व दर्जेदार बी-बियाणांची गरज आहे.

१९४४ मध्ये डॉ. आंबेडकरांनी त्रिसूत्रीच्या पूर्ततेच्या सूचना केल्या. तसे

सद्य:स्थितीत शेतकऱ्यांसाठी ज्वलंत प्रश्न असलेल्या शेतीमालाच्या हमीभावासाठी लागणारी रक्कम अग्रीम स्वरूपात सरकारने दिली पाहिजे. या सूचनेचा स्वीकार वर्तमानात तेलंगणा सरकारने केलेला दिसून येतो. हा दूरदृष्टिकोन डॉ. बाबासाहेबांच्या ठायी दिसून येतो.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शेतीची सर्वांत महत्त्वाची समस्या म्हणजे जलसिंचनाची. त्यावर डॉ. आंबेडकरांनी जातीने लक्ष दिले. भारतात पाण्याचा वापर, व्यवस्थापन आणि पाण्याचे वाटप यासंदर्भात कोणतेही स्पष्ट धोरण नव्हते. पाणी ही राष्ट्रीय संपत्ती असल्याने त्यासाठी राष्ट्रीय जलनीती असणे आवश्यक आहे, तसेच पूरनियंत्रण, जलसिंचन, मृदासंधारण या सर्व प्रगतीच्या वाटा आहेत. हे ओळखून केंद्रीय पाटबंधारे मंत्री असताना भारताच्या पाण्याच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी १५ धरणांच्या उभारणीचे संकल्पित चित्र तयार केले. त्यातूनच भाक्रानांगल, हिराकुंडसारखे मोठे प्रकल्प उभे राहिले. त्याचीच पुढची पायरी म्हणजे नदीजोड योजना. २००० नंतर भारतात नदीजोड प्रकल्पाची जोरदार चर्चा झालेली दिसते. मात्र या संकल्पनेचे जनक डॉ. आंबेडकर आहेत.

**सारांश –**

एकंदरीत पाहिल्यास आपणास असे दिसून येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या अर्थशास्त्रीय विचारांची मांडणी करताना भारतातील सर्वांत मोठा उद्योग शेती, याविषयी किती गांभीर्याने विवेचन करतात. या सर्व मांडणीत शेती आणि शेतकरी यांच्यासोबत सामाजिक न्यायाची अवधारणा कशी फलद्रूप होईल, याकडेही जातीने लक्ष देतात. शेती आणि उद्योग यांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादित करतात. आजही भारतीय शेतीचे प्रश्न पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार किती संयुक्तिक आहेत, यावर विश्वास वाढत जातो.

**संदर्भ**


१) थत्ते यदुनाथ (१९९४), डॉ. आंबेडकर जीवन विचार व कार्य, कौस्तुभ प्रकाशन, मुंबई.

२) 'शेतकरी' – भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर विशेषांक, ११ एप्रिल २०१७.

३) डॉ. देसाई आणि भालेराव, आर्थिक विचारांचा इतिहास, चंद ॲण्ड कंपनी लि., नवी दिल्ली, प्रथम आवृत्ती १९७३.

४) लोकराज्य, ऑक्टो. २००६, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

५) डॉ. भालचंद्र मुणगेकर, 'भारतीय आर्थिक सुधारणा आणि दलित एक आंबेडकरी दृष्टिकोन', सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १५/८/२००५.